राज्यामध्ये नागपूर, अहमदनगर, वाशिम आणि यवतमाळ या चार जिल्हयाध्ये इतर मागास वर्ग या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह बांधण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग,
शासन निर्णय : इमाव-२०१६/प्र.क्र.५८/विजाभज-१

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : २२ ऑगस्ट, २०१९.

वाचा : विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, शासन निर्णय
क्रमांक इमाव-२०१६/प्र.क्र.५८/विजाभज-१, दिनांक ३०/१/२०१९.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र विधान मंडळाच्या इतर मागासवर्ग कल्याण समितीच्या पुणे येथील दौऱ्यामध्ये दिनांक ०५/१०/२०१५ रोजी झालेल्या बैठकीत जिल्हास्तरावर प्रत्येक जिल्हयात इतर मागास वर्ग या प्रवर्गातील मुलां-मुलींसाठी नवीन शासकीय वसतिगृहे सुरु करणे व त्यांची देखभाल करण्याच्या सुचनेस अनुसरुन राज्यात मागणीनुसार जिल्हयाच्या ठिकाणी इतर मागास वर्ग या प्रवर्गातील मुलांसाठी १८ व मुलींसाठी १८ असे एकूण ३६ शासकिय वसतिगृह सुरु करण्यास दिनांक १५/१/२०१९ रोजी मा. मंत्रिमंडळाच्या झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आलेली आहे. मा. मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार दिनांक ३०/१/२०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.

शासन निर्णय :

प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे राज्यामध्ये इतर मागास वर्ग या प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी शासकीय वसतिगृह सुरु करणे आवश्यक असल्याने राज्यात जिल्हाच्या ठिकाणी मागणीनुसार मुलांसाठी १८ व मुलींसाठी १८ असे एकूण ३६ शासकीय वसतिगृह सुरु करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.

२. राज्यात जिल्हयाच्या ठिकाणी इतर मागास वर्ग या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी नवीन शासकीय वसतिगृह सुरु करण्यासाठी केंद्र शासनाच्या बाबु जगजीवन राम छात्र आवास योजनेंतर्गत सुरु करण्यात येणार आहे. सदरहू योजनेंतर्गत १०० विद्यार्थी क्षमतेचे एका वसतिगृहाच्या इमारत बांधकामासाठी केंद्र शासनाने प्रती विद्यार्थी रु. ३.०० लक्ष या प्रमाणे १०० विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह बांधकामासाठी रुपये ३.०० कोटी इतका खर्च निश्चित केलेला आहे.

वसतिगृह बांधकामाच्या या खर्चामध्ये एकूण खर्चाच्या रक्कमेपैकी मुलांसाठीच्या वसतिगृह बांधकामासाठी ६०% व मुलींसाठीच्या वसतिगृह बांधकामासाठी ९०% या प्रमाणात केंद्र शासनाचा हिस्सा असून राज्यशासनाचा मुलांसाठीच्या वसतिगृह बांधकामासाठी ४०% व मुलींसाठी वसतिगृह बांधकामासाठी १०% या प्रमाणात राज्य शासनाचा हिस्सा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. इतर मागास वर्ग या प्रवर्गातील मुला-मुलींसाठी जिल्हयाच्या ठिकाणी केंद्र शासनाच्या निकषाप्रमाणे जमीन उपलब्ध झाल्यानंतर केंद्र शासनाकडून प्रस्तावास मान्यता घेऊन वसतिगृहाचे बांधकाम सुरु करण्यात येणार आहे.

३. सदरहू प्रस्तावास अनुसरुन राज्यातील सर्व जिल्हयांकडून प्रस्ताव मागविण्यात आले असता नागपूर, अहमदनगर, यवतमाळ व वाशिम या ४ जिल्हयांमधून पुढीलप्रमाणे प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.

अ.क्र.	**जिल्हा**	**मुले / मुली**	**विद्यार्थी संख्या**	**ठिकाण**
१	नागपूर	मुली	५००	खसरा क्र.३२३/१-२-३ मधील आराजी ५००० चौ.मि. मधील जमीन मौजा वानाडोंगरी, ता. हिंगणा, जि. नागपूर
२	अहमदनगर	मुली	१००	८.०८ हे. आर. गट क्र. ५९५/१, मौजे वडगांव गुप्ता, अहमदनगर (जिल्हा मुख्यालय) पैकी किमान ३ एकर जागा
३	यवतमाळ	मुली	१००	शिट क्र. ५२, ए प्लॉट क्र.१ (मधील ०.४० आर) (४००० चौ.मि.) मौजा उमरसरा, ता. जि. यवतमाळ
४	वाशिम	मुली	१००	वाशिम भाग-३ मधील गट क्र. ३९६, ३९७ मध्ये क्षेत्र १३.२८ हे. आर. पैकी किमान ३ एकर

४. राज्यातून उपरोक्त ४ जिल्हयांतून प्राप्त प्रस्ताव दिनांक २०/७/२०१९ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास सादर करण्यात आलेले आहेत. सदरहू प्रस्तावात केंद्र शासनाकडून मान्यता विचाराधीन आहे.

५. केंद्र शासन मान्यतेच्या अधीन राहून इतर मागास वर्ग या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी नागपूर, अहमदनगर, यवतमाळ व वाशिम या ४ जिल्हयांमध्ये वसतिगृह बांधकामासाठी करण्यात येणाऱ्या खर्चापैकी राज्य शासन हिस्सा खर्च करण्यात या शासन निर्णयान्वये मान्यता

देण्यात येत आहे. या वसतिगृहाचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येईल या अटीवर प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

६. सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१९०८२२१६२३४०४७२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhaurao Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=VJNT OBCS SBC Welfare Dept., postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb827457be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2019.08.22 16:33:17 +05'30'

(भा. र. गावित)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री (विजाभज) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. विरोधी पक्ष नेता,विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई/नागपूर.
६. अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १./२, मुंबई/नागपूर.
८. जिल्हाधिकारी, सर्व जिल्हे.
९. संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे.
१०.सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग.
११.सर्व सहायक आयुक्त, समाजकल्याण विभाग.
१२.सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद.
१३.निवासी लेखा परिक्षक, मुंबई.
१४.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१५.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१६.निवड नस्ती (विजाभज-१).